नि दि दावा क्र. ०७/२०१९
अनुसया वि. शासन
३ **वादी तर्फे सा.क्र.९**
**(नि.क्र.१३८)**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.डी एस साबने वकील यांच्यामार्फत सुरु.**

२. मी अशिक्षीत आहे. मी माझे मतदारकार्ड आणलेले आहे. हिन्दू मुस्लीम दंगल जी हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचेवेळी झाली होती त्याबददल मला काही माहिती नाही. माझे आई वडीलांनी माझे जन्माच्या दरम्यान कोणती मोठी घटना घडली होती याबददल काही सांगितले नाही. माझे आई वडिल शिकले नव्हते. माझे वडिल १०-२० वर्षापुर्वी मयत झाले त्यांचे मृत्यूचा दाखल नाही. वडिल मयत होताना ५०-६० वर्षाचे होते. हे खरे की माझे मुळ गाव उमरगा रेतू हे आहे. मोरेवाडी ते उमरगा रेतू हे अंतर १४ कि मी आहे. मोरेवाडीहून शिरुर ताजबंद आणि अहमदपूर हे तुलनेने मोरेवाडी ते उमरगा रेतू यातील अंतरापेक्षा कमी आहे याबददल मला काही सांगता येत नाही. मोरेवाडी, चोबळी शिरुर ताजबंद याठिकाणी बाजेवाले बरेचजण आहेत, यास माझे सांगणे की आता आहेत त्यावेळी नव्हते. उमरगा रेतू गावची लोकसंख्या १९६५ साली १०००-५०० असावी. शिरुर ताजबंदची लोकसंख्या आमच्या गावापेक्षा जास्त आहे, हे खरे आहे. चोबळी गावची लोकसंख्या आमच्या गावापेक्षा जास्त आहे, याबददल मला माहिती नाही. त्याकाळी माझ्याशिवाय अन्य बाजेवोलेसुध्दा तिथे होते याबददल मला माहिती नाही. हे खरे नाही की, मी प्रतिवादीच्या लग्नात बाजा वाजविला होता, असे मी खोटे सांगतो. लग्नाची तारीख माझ्या लक्षात नाही. १९६५ साली मी जनाबाईच्या लग्नात बाजा वाजविला होता.

३. मला एक मुलगी व दोन मुलगे आहेत. मला एकूण आठ नातवंडे आहेत. मला महेश, काळूबाई, मुन्नी, आकाश,मंगलबाई, अनिशा, शामराव, बाई अशी नातवंडे आहेत. माझी कुठलीही नातवंडे बाजा वाजवत नाहीत.

४. माझ्या मुलीचे लग्न माझ्या दारात झाले. तिचे लग्न कधी झाले हे मला आठवत नाही. माझ्या मुलीचे लग्नात अंकुश धोंडीबा वाघमारे, शिवाजी विठठल वाघमारे यांनी बँड वाजवला. माझ्या लग्नात बाजा गावातल्या व्यकतीनेच वाजवला त्याचे नांव मला माहित नाही. माझ्या वडिलांची आणि माधवराव पाटील यांच्या ओळखतीतून मला जनाबाईच्या लग्नाचे वाजप मिळाले. मी सराईला दोन चार ठिकाणी बाजा वाजवायला जायचो. १९६५ साली मी किती जणांच्या लग्नात बाजा वाजवला हे माहिती नाही. १९६५ सालानंतर कोणाकोणाच्या कार्यक्रमामध्ये मी बाजा वाजवला हे मला सांगता येत नाही. कोणाच्या घरी मयत झाले आणि मला बोलाविले तर मी बाजा वाजवायला जात असे. त्याची लेखी पावती नाही. दहा गावात एक बाजेवाला अशी पुर्वी प्रथा होती, हे खरे नाही. हे खरे की, बाजेवाल्याला यजमानाच्या घरात बोलावून बाजा वाजवायला सांगितला जात नसे. आम्ही बाहेर उभे राहून बाजा वाजवीत असू. कोणाची मुलगी कोणाला दिली, हे आम्ही विचारायचे कारण नव्हते. जनाबाईचा मुलगा बाजीराव यांना कोणाची मुलगी दिली, हे मला माहिती नाही. बाजीरावची पत्नी कोणत्या गावची आहे, हे मला माहिती नाही, हे खरे आहे. हे खरे नाही की, सरतपासातील मजकूर मी खोटा सांगतो. हे खरे नाही की, जनाबाईच्या लग्नात मी वाजंत्री होतो हे मी खोटे सांगतो. जनाबाईच्या सासू सास-यांचे नांव मला माहिती नाही. हे खरे नाही की, जनाबाईच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत

आहे.   सदरचा दावा कोणाचा कशासाठी आहे हे मला माहिती नाही.  माझ्या मुलगयाने मला साक्ष देण्याबददल सांगितले.  हे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

**स्वाक्षरीत/-**

**(एस.एन.सरडे)**

दिनांक २१/०४/२०२६.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.